कनिष्ठ प्रशासन अधिकारी गट-क संवर्गातील कर्मचा-यांच्या
सर्वसाधारण बदल्या करणेबाबत – **विनंती बदली २०२५**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-२/ २८० /२०२५
अहिल्यानगर दि.१४/०५/२०२५

वाचा - १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४ /प्र.क्र.-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं. जिपब-४१४/प्र.क्रं.११२/आस्था-१४, दि. ०२/०७/२०१४
३. ग्रामविकास विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दि.०२/०१/२०१७
४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-८१७ / प्र.क्र.२२८ /आस्था- १४ दि. ०७/०३/२०१९.
५. ग्राम विकास विभागाकडील शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२२६/आस्था-१४ दिनांक ११ मे २०२२
६. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि.१४/०५/२०२५.

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार संदर्भ क्र.२ ते ४ शुध्दीपत्रक व तद्अनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार तसेच संदर्भ क्र.५ चे शासन पत्रानुसार बदल्या करण्यास दिलेल्या परावानगीनुसार जिल्हा परिषदेतंर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या **कनिष्ठ प्रशासन अधिकारी गट-क** या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने प्रकरण १ मधील ३ (क) नूसार व ४.४(७) नूसार विधवा कर्मचारी यांची बदली त्यांच्या नावापुढील रकाना क्रमांक ४ येथून रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी **विनंती** बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | सध्याचे कार्यरत ठिकाण | विनंती बदलीने द्यावयाचे ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीमती. जयश्री वैभव भागवत | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | पंचायत समिती जामखेड | आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर | विनंती |

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी आदेशाच्या दिनांकापासून मध्यान्होत्तर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन आदेशाच्या दिनांका नंतरचे वेतन व भत्ते अदा करु नयेत. तसेच मुद्दा क्र. ८ मध्ये नमुद केलेनुसार बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. सदरची बदली कर्मचा-याच्या विनंतीने असल्याने त्यांना पदग्रहन अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. बदली झालेल्या कर्मचा-यांनी रजेवर न जाता बदलीने पदस्थापना केलेल्या ठिकाणी त्वरीत हजर व्हावे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०५१४०४००८२असा आहे.

(आशिष येरेकर)(भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीमती – जयश्री वैभव भागवत, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड.

द्वारा संबंधीत कार्यालय प्रमुखांमार्फत

प्रत – गट विकास अधिकारी पंचायत समिती जामखेड.

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन आदेशाच्या दिनांक नंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत – जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत- निवड नस्ती.

(आशिष येरेकर)(भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर